# धिम्मापासून मुक्ततेची प्रार्थना

पित्या, मी तुझ्याशी सहमत आहे की मी भयाच्या अधीन आहे, परंतु मी तुझ्या प्रीतिचे मूल आहे. मुहम्मद याने शिकवलेल्या इस्लामच्या सर्व मागण्या मी नाकारतो आणि त्याच्याशी संबंध तोडण्याची घोषणा करतो. मी 'कुरआनच्या अल्लाहप्रत' असलेली माझी सर्व वचनबद्धता मोडण्याचे जाहीर करतो, आणि मी जाहीर करतो की आतापासून मी केवळ आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या देवाची उपासना करीन.

आम्ही, आमच्या पूर्वजांनी **धिम्मा** कराराच्या आणि त्यातील तत्त्वांच्या अधीन होण्याद्वारे जी पापे केली त्याबद्दल पश्चाताप करतो, आणि आम्ही त्यांच्या पापांबद्दल क्षमा मागतो.

मी स्वतः किंवा माझ्या पूर्वजांनी इस्लाम आणि समाजाच्या तत्त्वांप्रत केलेला कोणताही शरणागतीचा करार रद्द करतो, ज्याने आम्हाला इस्लाम समुदायाच्या आणि तत्वांच्या अधीनतेत आणले.

मी **धिम्मा** आणि त्याच्या सर्व अटींशी माझ्या पूर्ण विच्छेदनाची घोषणा करतो. मी **जिझिया** कराच्या प्रथेचा, तो ज्या ज्या गोष्टींचे प्रतीक आहे त्याचा मानेवर असलेल्या आघाताचा त्याग करतो. मी या विधीचे प्रतीक म्हणून दिलेल्या शिरच्छेदांच्या आणि विशेषतः मृत्यूच्या शापांपासून दूर जाण्याची घोषणा करतो.

मी जाहीर करतो की **धिम्मा** करार ख्रिस्ताच्या वधस्तंभावर खिळला गेला आहे. धिम्मा हा उघडपणे एक तमाशा बनला आहे आणि आता याचा मजवर काहीही अधिकार नाही. मी घोषित करतो की धिम्मा कराराची आत्मिक तत्वे ख्रिस्ताच्या वधस्तंभाद्वारे उघडकीस आली, निःशस्त्र झाली, पराभूत झाली व त्यांचा अपमान केला गेला.

मी इस्लामप्रत कृतज्ञतेची खोटी भावना त्यागण्याचे जाहीर करतो.

मी अपराधीपणाची खोटी भावना दूर करण्याचे जाहीर करतो.

मी कपट व लबाडीशी सर्व संबंध तोडण्याची घोषणा करतो.

ख्रिस्तावरील माझ्या विश्वासाबद्दल मौन बाळगण्याच्या माझ्या सर्व सम्मतींचा त्याग करण्याची मी घोषणा करतो.

मी **धिम्मा** किंवा इस्लामविषयी गप्प राहण्याच्या माझ्या सर्व सम्मतींचा त्याग करण्याची घोषणा करतो.

मी बोलेन आणि गप्प बसणार नाही.

मी जाहीर करतो की "सत्य मला बंधमुक्त करेल" (योहान 8:32) आणि मी ख्रिस्त येशूमध्ये एक स्वतंत्र मनुष्य म्हणून जगण्याचे निवडतो.

इस्लामच्या नावाखाली, माझ्यावर आणि माझ्या कुटुंबावर म्हटलेले सर्व शाप मी त्यागतो आणि रद्द करतो. मी माझ्या पूर्वजांवर सांगितलेल्या सर्व शापांचा त्याग करून ते रद्द करण्याची घोषणा करतो.

मी विशिष्टरित्या मृत्यूच्या शापाचा त्याग करतो व तो रद्द करण्याची घोषणा करतो, मृत्यू, आतापासून तुझा माझ्यावर अधिकार नाही!

मी जाहीर करतो की या शापांचा माझ्यावर काही अधिकार नाही.

मी माझा आत्मिक वारसा म्हणून ख्रिस्ताच्या आशीर्वादांचा दावा करतो.

मी माझ्यावर लादलेल्या सर्व भीतीदायक धमक्यांपासून मुक्त होण्याची घोषणा करतो.

मी ख्रिस्तामध्ये धैर्यवान असण्याची निवड करतो.

मी सर्व प्रकारच्या लबाडीपासून व नियंत्रणापासून दूर जाण्याची घोषणा करतो.

मी वाईट वागणूक आणि हिंसा यापासून मुक्त असल्याचे जाहीर करतो.

मी भीतीचा त्याग करतो. नाकारले जाण्याच्या भयाचा त्याग करतो. माझी संपत्ती गमावण्याची भीती मी त्यागतो. दारिद्र्याची भीती, गुलामगिरीची भीती, बलात्काराची भीती, एकटेपणाची भीती, माझ्या कुटुंबास गमावण्याची भीती मी दूर करतो. मी खूनाच्या भीतीचा आणि मृत्यूच्या भीतीचा त्याग करण्याची घोषणा करतो.

इस्लामची भीती मी त्यागतो. मुसलमानांची भीती मी त्यागतो. सार्वजनिक किंवा राजकीय कार्यात सहभागी असण्याच्या भीतीचा त्याग करण्याची मी घोषणा करतो.

येशू ख्रिस्त सर्वस्वाचा प्रभू आहे अशी मी घोषणा करतो.

मी माझ्या आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात प्रभू म्हणून येशूच्या अधीन होतो. येशू ख्रिस्त माझ्या घराचा प्रभू आहे. येशू ख्रिस्त माझ्या शहराचा प्रभू आहे. येशू ख्रिस्त माझ्या राष्ट्राचा प्रभू आहे. येशू ख्रिस्त हा माझ्या देशातील सर्व लोकांचा प्रभू आहे. मी येशूला प्रभू म्हणून शरण जातो.

मी मानखंडनेपासून दूर जाण्याची घोषणा करतो. ख्रिस्ताने मला स्वीकारले आहे हे मी जाहीर करतो. मी त्याची आणि फक्त त्याची सेवा करतो.

मी लांछन तोडण्याची घोषणा करतो. मी जाहीर करतो की मी वधस्तंभाद्वारे सर्व पापांपासून शुद्ध आहे. लाजेचा आता माझ्यावर अधिकार नाही आणि मी ख्रिस्ताबरोबर गौरवाने राज्य करीन.

परमेश्वरा, मुसलमानांचा द्वेष केल्याबद्दल मला व माझ्या सर्व पूर्वजांना क्षमा कर. मी मुसलमान व इतर सर्व लोकांविषयीच्या द्वेषभावनेचा त्याग करतो आणि मुसलमान तसेच पृथ्वीवरील सर्व लोकांवर ख्रिस्ताच्या प्रेमाची घोषणा करतो.

मी मंडळीच्या पापांसाठी आणि मंडळीच्या पुढाऱ्यांनी चुकीने इतरांस अधीन करण्याद्वारे जे पाप केले त्यांसाठी पश्चाताप करतो.

मी परकेपणाचा त्याग केल्याची घोषणा करतो. मी जाहीर करतो की ख्रिस्ताद्वारे देवाने मला क्षमा केली आहे आणि स्वीकारले आहे. माझा देवाशी समेट झाला आहे. स्वर्गातील किंवा पृथ्वीवरील कोणतीही शक्ती परमेश्वराच्या सिंहासनासमोर माझ्यावर दोषारोप ठेवू शकत नाही.

मी माझ्या देवपित्याची, माझा एकमेव तारणकर्ता प्रभु येशू ख्रिस्त याची आणि एकमात्र जीवन देणारा पवित्र आत्मा याची स्तुती करतो आणि त्याचे आभार मानतो.

मी स्वतःला प्रभु येशू ख्रिस्ताचा जिवंत साक्षीदार म्हणून वचनबद्ध करतो. त्याच्या वधस्तंभाची मला लाज वाटत नाही. त्याच्या पुनरुत्थानाची मला लाज वाटत नाही.

मी घोषणा करतो की मी जिवंत देवाचे मूल आहे, जो अब्राहाम, इसहाक आणि याकोबाचा देव आहे.

मी देवाच्या आणि त्याच्या मशिहाच्या विजयाची घोषणा करतो. मी घोषणा करतो की प्रत्येक गुडघा वाकेल आणि प्रत्येक जीभ त्याजपुढे कबूल करेल की देवापित्याच्या गौरवासाठी येशू ख्रिस्त हा प्रभू आहे.

धिम्मी अवस्थेत भाग घेण्यासाठी मी मुसलमानांप्रत क्षमेची घोषणा करतो.

परमेश्वर पित्या, कृपा करून मला धिम्मापासून, धिम्माच्या आत्म्यापासून, धिम्मा कराराशी निगडित असलेल्या ईश्वररहित तत्वापासून मुक्त कर.

मी आता तुला विनंती करतो की मला तुझ्या पवित्र आत्म्याने परिपूर्ण कर, आणि मजवर येशू ख्रिस्ताच्या राज्याच्या सर्व आशीर्वादांची वृष्टी कर. मला तुझ्या वचनाचे सत्य स्पष्टपणे समजण्यास व ते माझ्या जीवनाच्या सर्व क्षेत्रात लागू करण्यास मदत कर. मला आशा आणि जीवनाची वचने दे, जसे तू अभिवचन दिले की तू करणार, आणि माझ्या ओठांस आशीर्वादित कर म्हणजे मला येशूच्या नावातील अधिकाराने व सामर्थ्याने ते इतरांस बोलता येईल. ख्रिस्ताचा विश्वासू साक्षीदार म्हणून बोलण्याचे धाडस मला दे.

मला मुसलमानांबद्दल गंभीर प्रेम आणि त्यांस ख्रिस्ताच्या प्रीतीविषयी सांगण्यासाठी आवेश दे. मी या गोष्टींची घोषणा करतो आणि माझा प्रभू व तारणारा म्हणून येशू ख्रिस्ताच्या नावात या गोष्टी मागतो. आमेन.